साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

# परळी पालिकेवर महायुतीची एकहाती सत्ता

## नव्या नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी; दोन्ही काँग्रेसचा धुव्वा!

परळी वैजनाथ (बातमीदार):- सबंध मराठवाड्याचे लक्ष लागलेल्या परळी नगर पालिकेच्या निवडणुकीत ज्येष्ठ नेते आमदार धनंजय मुंडे व मंत्री पंकजाताई मुंडे या बहीण-भावांनी मिळून महायुतीच्या माध्यमातून पुन्हा एकदा एकहाती विजय मिळवत, परळी नगर पालिकेसह या मतदारसंघात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. महायुतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी या तब्बल १५ हजार ६६४ मताधिक्याने विजयी झाल्या आहेत. या विजयाने महायुतीच्या कार्यकर्त्यांनी परळीत पुन्हा दिवाळी साजरी केली आहे.

परळीतील १७ प्रभागातून निवडलेल्या ३५ पैकी २५ जागांवर महायुतीचे उमेदवार निवडून आले आहेत.



इतर सहा उमेदवार अपक्ष निवडून आले असून, या सहापैकी पाच उमेदवारांनी महायुतीला निकालादिवशीच पाठिंबा दिला आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला (शरद पवार गट) केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले आहे. या पक्षाचे नेते दीपक देशमुख यांचा वार्ड क्रमांक सहामधून दारून पराभव झाला आहे तर काँग्रेसलाही केवळ एकच जागा मिळाली आहे. एमआयएमने खाते उघडत एका जागेवर विजय मिळवला आहे.

आ.धनंजय मुंडे यांनी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या यश:श्री निवासस्थानी जाऊन पंकजाताईंना शुभेच्छा देत विजयी जल्लोष साजरा केला. परळीच्या जनतेने आम्हाला वेळोवेळी आशीर्वाद दिले, मात्र मागील काही दिवसांमध्ये परळीच्या मातीची आणि इथल्या माणसांची जी बदनामी राजकीय द्वेषातून केली जात होती, त्याला आज परळीच्या जनतेने मतांमधून उत्तर दिले असल्याचे वक्तव्य आ.धनंजय मुंडे यांनी केले आहे. तर पंकजाताई मुंडे यांनी आगामी निवडणुकांमध्ये देखील परळी मतदारसंघात महायुती म्हणूनच आम्ही सामोरे जाऊ असे सूतोवाच करत सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले आहे.

दरम्यान रविवारी (दि.२१) सकाळी आठ वाजल्यापासूनच परळी पालिकेच्या परिसरात मतमोजणीचा निकाल ऐकण्यासाठी कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. दहा नंतर निकाल सुरू झाले. महायुतीच्या बाजुने निकाल लागत गेल्याने पक्षाचे नेते व कार्यकर्ते आनंदित होऊन जल्लोष करू लागले. गुलालाची उधळण, नेत्यांचा जयघोष यामुळे परिसर दणाणुन गेला होता. दुपारनंतर विजयी उमेदवारांना निवडणूक निर्णय अरविंद लाटकर यांनी निवडणुकीतील विजयाच्या प्रमाणपत्राचे वितरण केले. निवडून आलेल्या उमेदवारांनी आपल्या प्रभागात जाऊन मतदारांचे आभार मानले. यावेळी कार्यकर्त्यांनी, नागरिकांनी विजयी उमेदवारांना पुष्पहार घालून गुलाल उधळत त्यांचे जोरदार स्वागत केले. फटाक्यांची आतषबाजीही यावेळी करण्यात आली. रात्री उशिरापर्यंत शहरातील गल्लीबोळात ही आतषबाजी चालू होती. **

### उपनगराध्यक्ष कोण होणार? याची आता मोठी उत्सुकता

**परळी पालिकेच्या निवडणुकीत महायुतीने एक हाती सत्ता मिळवली आहे. नगराध्यक्षासह २५ नगरसेवक महायुतीचे परळी पालिकेवर निवडून आले आहेत. नव्या पालिकेत उपनगराध्यक पद कोणाला मिळते याची मोठी उत्सुकता परळीकरांना व कार्यकर्त्यांना आहे. यासाठी भाजपचे जेष्ठ युवक नेते दुसऱ्यांदा निवडेन आलेले प्रा.पवनकुमार मुंडे, अंजली माळी-बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शेख हाजी बाबू, शिल्पा लाहोटी, खैसर बेगम राजाखान पठाण, प्राजक्ता कराड, शिवसेनेच्या जयश्री गित्ते आदी नगरसेवकांची नावे चर्चेत आहेत महायुतीचे नेते उपनगराध्यक्ष पदासाठी कोणाची निवड करतात याकडे सर्वांचे लक्ष आहे.**



परळी पालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्र.१४ मधून सलग दुसऱ्यांदा मोठ्या मताधिक्याने विजयी झालेले भाजपचे ज्येष्ठ नेते प्रा.पवनकुमार मुंडे यांचा विजयोत्सव साजरा करताना कार्यकर्ते.

### ----० परळी पालिकेत निवडून आलेले उमेदवार ०----

**महायुतीचे विजयी उमेदवार:-** सौ.वंदना आघाव, दीपक मुंडे, सौ. कवीता इंगळे, अल्ताफखान पठाण, नितीन रोडे, सौ.जयश्री मोगरकर, वैजनाथ सोळंके, सौ.अंजली माळी, व्यंकटेश शिंदे, सचिन सारडा, कार्तिक कांबळे, खैसर राजाखान पठाण, सौ.सरोजा डावरे, कुसूमबाई चाटे, महादेव रोडे, सौ.जयश्री गित्ते, सौ.प्राजक्ता कराड, योगेश मेनकुदळे, रेश्मा बळवंत, शिल्पा लाहोटी, प्रा.पवनकुमार मुंडे, डॉ.पूजा तोतला, सौ.प्रतिक्षा देशमुख, सौ.रूपाली पवार, हाजीबाबू शेख.

**राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट):-** कुरेशी आरेफा बेगम, नितीन बागवाले.

**काँग्रेस आय:-** फारूक गणी सय्यद. **एमआयएम:-** शेख आयेशा

**अपक्ष:-** सौ.मीरा नागरगोजे, अश्विनी केंद्रे, अर्चना रोडे, लक्ष्मण मुरकुटे, सय्यद फरजाना, ईस्माईल मौला शेख.






# महाविकास आघाडीतील बिघाडीमुळेच महायुतीचा परळी पालिकेवर झेंडा

**काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) व शिवसेना (उबाठा) महाविकास आघाडीतील हे घटक पक्ष परळी पालिकेच्या निवडणुकीत स्वतंत्र लढल्याने झालेली मत विभागणी तसेच भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) व इतर मित्रपक्ष यांच्या महायुतीची ताकद एकवटल्याने परळी पालिकेवर या निवडणुकीत महायुतीचा झेंडा शहराच्या इतिहासात प्रथमच फडकला आहे.**




'कुणाचीच हवा न वारा...पैशाचा जोर सारा' या निवडणुकीत इथे दिसला. मतदाररुपी 'चिमडी'ला 'दमडी'त खुष करून सत्ता मिळवण्याची लोकशाहीला घातक असलेली प्रथा या निवडणुकीत प्रकर्षाने येथे दिसली, ती आता आणखीन दृढ झाली आहे. लाखोच काय अनेक कोटी रुपये खर्च करत 'यशाचा' गुलाल उधळायचा आणि वर आमचा 'नाद' करायचा नाही' असे म्हणत आपली पाट आपणच थोपटायची, ही कृती या निवडणुकीत पुन्हा पहायला मिळाली. यामुळे सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी निवडणुकीपासून कोसो दूर राहण्याचा पायंडा पुन्हा एकदा येथे भक्कम झाला आहे.

निवडणुकीची कितीतरी दिवस अगोदरपासून कोणतीच तयारी करायची नाही, निवडणुका जाहीर होताच. निवडणुकीच्या मैदानात उतरून कोरड्या डरकाळ्या फोडत नुसतीच 'हवा' करायची आणि मतदानावेळी आपली पाठ पराभवाने लोळवून घेण्याची विरोधकांची भूमिका व परंपरा या निवडणुकीत येथे पुन्हा दिसली.

परळी पालिकेतील सावळा गोंधळ, बोकाळलेला भ्रष्टाचार, अनेक विकास योजनांची लागलेली वाट, अधिकाऱ्यांची मनमानी, त्यांची गैरहजरी, निष्क्रियता यामुळे वैतागलेले व संतप्त झालेले परळीकर या निवडणुकीत परिवर्तन घडवतील, असे वातावरण या निवडणुकीच्या सुरुवातीला येथे होते. परंतु विरोधकांचा सक्षम व विश्वास ठेवण्याजोगा पर्याय निवडणुकीत न दिसल्याने सत्ताधाऱ्यांना पुन्हा सत्तेचा 'वाटा' येथील मतदारांनी देऊन ते मोकळे झाले आहेत. इथले प्रशासनातील बरेच अधिकारी सत्ताधाऱ्यांच्या दावणीचे बैल होऊन बसल्याने प्रभाग रचनेपासून ते मतदार याद्या तयार करण्यापर्यंतचे काम सत्ताधाऱ्यांच्या सोयीप्रमाणे व त्यांच्या सल्ल्याने करतात. सत्ताधाऱ्यांचे हित होईल अशीच भूमिका सरकारी नियमात बसून ते घेतात. मतदानाच्या दिवसापर्यंत या भूमिकेला ते जागतात, यामुळे विरोधकांनी निवडणुकीच्या मैदानात कितीही डरकाळ्या फोडल्या, हाबूक ठोकल्या तरी काहीच उपयोग होत नाही, याची जाणीव पुन्हा या निवडणुकीने करून दिली आहे.

मागच्या पंधरा वर्षापासून म्हणजे या काळात झालेल्या दोन्हीही पालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस आताच्या अजित पवार गटाची एकहाती सत्ता परळी पालिकेवर राहिलेली आहे. या निवडणुकीत राजकारणातील बदललेल्या वातावरणाचे व नेत्यांच्या भूमिकेने यशाची पूर्ण खात्री या पक्षाला यंदा नव्हती. महायुतीमुळे भाजप व युतीतील घटक पक्षाची ताकद मिळाल्याने राष्ट्रवादीचे बळ वाढले. त्यातच महाविकास आघाडीत झालेली बिघाडी व त्यांचे पडलेले वेगवेगळे गट यामुळे विभागलेली ताकद महायुतीच्या

**❋ परळी पालिका निवडणूक विश्लेषण ❋**
**– लक्ष्मण वाकडे, पत्रकार, परळी वैजनाथ.**

फायद्याची झाली व ती पथ्यावर पडली. सर्वस्तरातील व समाजाच्या सर्व घटकातील सक्षम कार्यकर्त्यांना दिलेली उमेदवारी, प्रचाराचे केलेले उत्तम नियोजन, शहराचा केलेला विकास, करावयाची विकासकामे, मतदानाच्या वेळी केलेले नियोजन, मतदान आपल्याच पारड्यात पाडून घेण्यासाठी उभी केलेली यंत्रणा तसेच निवडणुकीत परळीत यश कसे मिळवायचे याची सापडलेली 'जादूची कांडी' अशा अनेक कारणामुळे महायुतीच्या अर्थात युतीतील प्रमुख घटक पक्ष असलेल्या सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसला परळी पालिकेच्या निवडणुकीचा गड पुन्हा राखता आला आहे.

महाविकास आघाडी असूनही काँग्रेसच्या पाठीत ऐन निवडणुकीत खंजीर खुपसून मांडलेली वेगळी चूल व निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलून, तिकुन इकडे आलेल्या नेत्यांच्या पत्नीला व नेत्याला तसेच इतरांना उमेदवारी देण्याच्या भूमिकेमुळे तुतारी वाजवणाऱ्या माणसाचे चिन्ह असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसची इथे नुसतीच हवा झाली. निवडणुकीसाठी लागणारे प्रभावी मुद्दे नाहीत, शहराच्या विकासाचा ठोस कार्यक्रम नाही, प्रचाराच्या भाषणातून वैयक्तिक विषारी टीका आणि पोरासोरी बाजार. यामुळे इथे या निवडणुकीत तुतारीतून नुसती हवाच आली, ती वाजलीच नाही. त्यातच प्रचारासाठी मिळालेला अपुरा वेळ, अनेक प्रभावहीन नवे उमेदवार, स्थानिक नेतृत्वाची मनमानी, मतदानादरम्यानची अपुरी यंत्रणा, कार्यकर्त्यांचे अपुरे पाठबळ, मतदान केंद्रावर सक्षम नसलेली यंत्रणा, प्रशासनाचे नसलेले सहकार्य, याचा मोठा फटका येथे शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला बसला. जिल्ह्याच्या खासदारांना निवडणुकीच्या मैदानात येथे प्रचारासाठी उतरूनही त्याचा कोणताच फायदा येथे या निवडणुकीत झाला नाही. कार्यकर्त्यांना, नेत्यांना विश्वासात न घेणे व आपलीच मनमानी करणे, या भूमिकेनेही या पक्षाचे येथे नुकसान झाले. त्यातच ऐन निवडणुकीत 'तिकडून' इकडे येणे व थेट उमेदवारी घेणे, याचे गुढ येथे सर्वसामान्यांना शेवटपर्यंत कळलेच नाही, त्यामुळे या नेतृत्वावर या पक्षाला मानणाऱ्या मतदारांचा विश्वास बसला नाही. अशा अनेक कारणामुळे या निवडणुकीत तुतारीचा आवाज घुमलाच नाही. या पक्षाचे केवळ दोन उमेदवार या निवडणुकीत निवडून येऊ शकले.

मागच्या अनेक वर्षापासून सत्ताधाऱ्यांच्या विरोधात लढणारे, परळी पालिकेतील भ्रष्टाचाराला चव्हाट्यावर आणून त्याविरुद्ध सतत संघर्ष करणारे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बहादूरभाई यांना राष्ट्रवादी काँग्रेसने (शरद पवार गट) ऐन निवडणुकीत धोका दिल्याने सर्वसामान्यांची त्यांच्याबद्दल सहानुभूती वाढली. परंतु निवडणूक लढवण्यासाठी लागणारी यंत्रणा, कार्यकर्त्यांचे बळ, पक्षातील नेत्यांची साथ, सहकार्य न लाभणे, मतदारापर्यंत जाण्यास मिळालेला अपुरा वेळ, प्रचाराचे नसलेले नियोजन, त्यातच या निवडणुकीची पक्षाची धुरा सांभाळणारे बहादूरभाईंचे आजारपण याचा मोठा फटका या निवडणुकीत काँग्रेसला बसला. वंचित बहुजन आघाडीला काँग्रेसने सोबत घेतले असले तरी ही आघाडी मतपेटीवर खूप मोठा प्रभाव दाखवू शकली नाही. परळी शहरातील सर्व जागेवर उमेदवारही काँग्रेसला उभे करता आले नाहीत. या निवडणुकीत काँग्रेसची ताकद कमी पडली. महायुतीच्या विरोधात ते तगडी फाईट देऊ शकले नाहीत, मतविभागणीमुळे या निवडणुकीत काँग्रेसला तिसऱ्या स्थानावर जावे लागले. या आघाडीचा केवळ एक नगरसेवक या निवडणुकीत निवडला गेला. त्यातच प्रभाग रचनेचा घोळ, मतदार याद्यात असलेली बोगस नावे, याचाही मोठा फटका विरोधात लढणाऱ्या दोन्ही काँग्रेसला, शिवसेनेला (उबाठा) बसला आहे. दीर्घकाळ परळी पालिकेवर सत्ता गाजवणाऱ्या काँग्रेसची मोठी वाताहात या निवडणुकीत पाहायला मिळाली. तसेच आघाडीतून बाहेर पडलेल्या शिवसेनेची (उबाठा) हीच अवस्था येथे झाली. महाविकास आघाडीने ही निवडणूक एकत्र येऊन मोठ्या ताकदीनिशी लढवली असती तर या निवडणुकीत वेगळे चित्र दिसले असते. ❋❋❋

# पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी परळीच्या पाचव्या महिला नगराध्यक्षा

**परळी वैजनाथ (एस.एल.वाकडे):– परळी वैजनाथ येथील नगरपालिकेच्या पाचव्या महिला नगराध्यक्ष होण्याचा मान या पालिकेवर नव्याने निवडून आलेल्या महायुतीच्या नूतन नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांना मिळाला आहे.**

सौ.धर्माधिकारी या आजपर्यंत झालेल्या महिला नगराध्यक्षात सर्वात तरुण नगराध्यक्षा आहेत. यापूर्वी धर्माधिकारी कुटुंबाने परळी पालिकेचे नगरसेवक, उपनगराध्यक्ष पद तसेच ज्येष्ठ नेते बाजीराव धर्माधिकारी यांनी परळी पालिकेचे नगराध्यक्षपद भूषवले आहे. ते २०१४ ते २०१७ या कालावधीत परळीचे नगराध्यक्ष होते. पालिकेचे सर्वात तरुण नगराध्यक्ष होण्याचा मान श्री धर्माधिकारी यांना मिळाला होता. तेव्हा नगराध्यक्षाची निवड नगरसेवकातून झाली होती. नुकत्याच झालेल्या परळी पालिकेच्या निवडणुकीत राजकीय वारसा लाभलेल्या धर्माधिकारी कुटुंबातील श्री बाजीरावभैय्या



धर्माधिकारी यांच्या पत्नी सौ.पद्मश्री धर्माधिकारी १५ हजार ६६४ मताधिक्याने विजयी झाल्या आहेत. हा त्यांचा विक्रमच आहे. आजपर्यंतच्या नगराध्यक्षात सर्वात तरुण नगराध्यक्षा होण्याचा व मोठे मताधिक्य मिळवण्याचा मान त्यांना मिळाला आहे. नगराध्यक्षपदाची ही निवडणूक थेट जनतेतून झाली. यापूर्वी श्रीमती राधाबाई बियाणी व सौ.सरोजनी हालगे या महिला उमेदवार परळीच्या नगराध्यक्षा म्हणून थेट जनतेतून निवडल्या गेल्या होत्या. श्रीमती बियाणी या सलग दोन वेळा निवडून आल्या होत्या. जनतेतून निवडल्या गेलेल्या श्रीमती धर्माधिकारी या तिसऱ्या नगराध्यक्षा आहेत तर पालिकेच्या पाचव्या महिला नगराध्यक्षा म्हणून त्यांची निवड झालेली आहे. यापूर्वी सौ.शारदा देशमुख, मालनबी शेख, श्रीमती राधाबाई बियाणी, सरोजनी हालगे यांनी परळी पालिकेचे अध्यक्षपद भूषवले आहे. श्रीमती धर्माधिकारी उच्चशिक्षित आहेत, त्यांच्या या निवडीने परळीत महिलांचे नवे नेतृत्व उदयास आले आहे. ही निवडणूक त्यांनी प्रथमच लढवली आहे. ❋❋

संपादकीय...

# नवे कारभारी, नवी आव्हाने..!

**✻ सुविचार ✻**

**शून्य होऊन जगता आलं पाहिजे, ना कोणी असण्याचा आनंद, ना कोणी नसण्याचं दु:ख..!**

मागच्या नऊ वर्षानंतर झालेल्या व सबंध बीड जिल्ह्यासह मराठवाड्याचे लक्ष लागलेल्या परळी वैजनाथ नगरपालिकेवर या निवडणुकीत महायुतीचा झेंडा फडकला आहे. यामुळे इथले आमदार व ज्येष्ठ नेते धनंजय मुंडे आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांची परळी शहरावरील पकड आणखीन मजबूत झाली आहे.

महायुतीमुळे परळी शहराच्या इतिहासात परळी पालिकेच्या निवडणुकीत प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) व भाजप आणि इतर मित्रपक्षांनी एकत्र येऊन ही निवडणूक महायुतीच्या झेंड्याखाली लढवली. नगराध्यक्षासह १७ प्रभागातून ३५ नगरसेवक निवडायचे असल्याने तिकीट वाटपात उमेदवारांचा सर्वात मोठा वाटा राष्ट्रवादीने आपल्याकडे ठेवला. यामुळे भाजप व महायुतीतील इतर घटक पक्षात या निवडणुकीच्या सुरुवातीला नेत्यांमध्ये तसेच कार्यकर्त्यांमध्ये धुसपुस होती. परंतु ही नाराजी टिकली नाही. महायुतीने विचारपूर्वक दिलेले उमेदवार तरुण व नव्या कार्यकर्त्यांना दिलेली संधी, निवडणुकीची केलेली तयारी, लावलेली शक्ती, नेत्याची प्रतिष्ठा अशा अनेक कारणांमुळे पालिकेच्या या निवडणुकीत महायुतीला भरभरून यश मिळाले. नगराध्यक्षासह ३५ पैकी २५ नगरसेवक महायुतीचे निवडून आले. यामुळे परळी पालिकेवर महायुतीची एकहाती सत्ता आली आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), एमआयएम यांचे चार व इतर अपक्ष सहा असे मिळून १० नगरसेवक परळी पालिकेवर निवडून आले आहेत. सहा अपक्ष उमेदवारांपैकी काही नगरसेवक महायुतीचे समर्थक असल्याने या पालिकेत विरोधकांची ताकद खूप कमी अथवा नगण्य आहे, असे म्हणता येईल. निवडून आलेल्या ३५ नगरसेवकात प्रा.पवनकुमार मुंडे, अंजली माळी, प्राजक्ता कराड आदी नगरसेवक दुसऱ्यांना निवडून आले आहे. नूतन नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह तीस-बत्तीस नगरसेवक प्रथमच परळी पालिकेवर निवडले गेले आहेत. यात तरुण व नव्या चेहऱ्यांच्या नगरसेवकाची संख्या अधिक आहे. पुढील पाच वर्षे या कारभाऱ्यांना परळी पालिकेचा कारभार सांभाळायचा आहे. २०१६ ला झालेल्या पालिकेच्या निवडणुकीनंतर सुमारे नऊ वर्षाने ही निवडणूक झाली. मागची तीन-चार वर्ष परळी पालिकेवर प्रशासक असल्याने या पालिकेचा व शहराचा कारभार अधिकारी पहात असल्याने परळीकरांची मोठी गैरसोय झाली. या काळात अनेक अधिकाऱ्यांची चाललेली मनमानी, गैरहजरी, विकास कामातील अनियमित्ता, निष्क्रियता, भ्रष्टाचार व सर्वसामान्य नागरिकांची होणारी आडवणूक यामुळे पालिकेच्या कारभाराला, अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेला परळीची सर्वसामान्य जनता कमालीची वैतागली होती. पालिकेच्या निवडणुका कधी होतात असे सर्वांना झाले होते. या निवडणुकीनंतर निवडून आलेल्या नव्या कारभाऱ्यांकडून सर्वसामान्य परळीकरांच्या मोठ्या आशा आणि अपेक्षा आहेत. परळी पालिकेचा कारभार स्वच्छ, पारदर्शक, तत्पर व लोकाभिमुख व्हावा, असे सर्वांना वाटते. सर्वसामान्यांची पालिकेतील व पालिकेच्या संबंधातील कामे विनाविलंब व्हावीत यासह शहरातील स्वच्छता, पथदिवे, पालिकेमार्फत नळाला येणाऱ्या पाण्याचे वेळापत्रक असणे, शहरात सुरू असलेली व होणारी विकासकामे दर्जेदार होणे, खड्डे मुक्त रस्ते, अतिक्रमणे मुक्त शहर, वाहतुकीची कोंडी, जड व रखेच्या वाहनांची वाहतूक, या वाहतुकीच्या राखेमुळे होणारे प्रदूषण असे अनेक प्रश्न व समस्यांकडे नव्या पदाधिकाऱ्यांना लक्ष घालावे लागणार आहे. गटार योजनेसारख्या बंद पडलेल्या व रेंगाळलेल्या विकासकामात लक्ष देऊन त्यांना गती देण्याचे मोठे आव्हान नव्या कारभाऱ्याकडे असणार आहे. पालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असलेल्या मालमत्ता कराची, पाणीपट्टीची तसेच इतर मार्गाने मिळणाऱ्या कराची वसुली याकडेही अधिक लक्ष द्यावे लागणार आहे. पालिकेला गतवैभव प्राप्त करून देण्याची जबाबदारी नव्या कारभाऱ्यांकडे असणार आहे. नव्या कारभाऱ्यांना, त्यांच्या वाटचालीस आमच्या शुभेच्छा.! ✻✻✻

# साने गुरुजी शिक्षक म्हणून कसे होते.?


साने आणि गुरुजी हे दोन्ही शब्द अगदी समानार्थी असावेत अशी महाराष्ट्रात अजूनही स्थिती आहे. याबाबत नानासाहेब गोरे म्हणत 'गुरुजी या सामान्य नामाचे आपल्या गुणविशेषांनी त्यांनी विशेषणनाम बनविले' तेव्हा गुरुजींची पहिली ओळख ही शिक्षक म्हणून आहे. गुरुजींच्या प्रेरणेने अनेक प्रतिभावंत महाराष्ट्रात शिक्षक झाले.

पण इतके असूनही साने गुरुजींनी शिक्षक म्हणून काय काम केले? हे फारसे पोहोचले नाही. गुरुजीच्या व्यक्तिमत्वाला अनेकविध पैलू असल्याने इतर पैलुमुळे त्यांच्या शिक्षक असण्याची फार चर्चा झाली नाही. गुरुजी एक चांगले शिक्षक होते याबाबत आदर आहे पण त्याविषयी फार माहिती नाही असे झाले.

त्यामुळे साने गुरुजी शिक्षक म्हणून कसे होते? शिक्षक समुदायाला त्यांचे शिक्षक असणे नक्कीच प्रेरणादायक ठरणार आहे. गुरुजींच्या हयातीचा अर्धशतकाचा कालखंड हा टिळक अण्णासाहेब विजापूरकर महर्षि कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील,पंजाबराव देशमुख हे सारे प्रवृतीने शिक्षक व शैक्षणिक तत्वज्ञ होते.महात्मा फुलेंनी त्यापूर्वी वंचितांच्या शिक्षणाची मांडणी आणि कृती केलेली होती. आई व शिक्षक हे गुरुजींच्या शैक्षणिक व्यूहातील कळीचे घटक होते.

**शिक्षक म्हणून गुरुजींनी नेमके कसे काम केले ?** खानदेश एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलमध्ये १७ जून १९२४ ला साने गुरुजी शिक्षक झाले अनेक नामवंत शिक्षक गुरुजींसोबत त्याकाळात होते. कवी माधव ज्युलियन ही त्यांच्यासोबत दोन वर्षे सोबत शिक्षक होते. साने हे कितपत चांगले शिक्षक होतील याची शंका अशासाठी होती की त्यांचा स्वभाव संकोची होता. पुन्हा ते एम. ए. होते त्यामुळे यांच्याकडे शिक्षण शास्त्राची पदवी नाही. त्यामुळे हे कसे शिकवणार हा प्रश्न होता. गरीब स्वभावामुळे ते मुलांवर छाप टाकू शकतील का? मुलांनाही दरारा नसलेले व्यक्तिमत्व नसल्यामुळे मुलांना ही ते प्रभावी शिक्षक वाटत नव्हते. सुरवातीला त्यांचा तास सुरू असताना मुले उठून जात येऊन बसत पण गुरुजी त्यांना काहीच बोलत नसत पण अतिशय तळमळीने बोलत. त्याचा परिणाम होत गेला आणि गुरुजी एक प्रभावी शिक्षक झाले. मुलांवर प्रभाव वाढत गेला.

काळी टोपी,ओठावर ठसठशीत मिशा, गळ्याभोवती गुंडाळलेले उपरणे आणि त्याचे लोंबते सोगे, काळा गळाबंद, लांब कोट, पायघोळ धोतर, पायात पुणेरी जोडा व हातात पुस्तक असा एकूण गुरुजींचा पेहराव असायचा. सुरवातीला ते ५ वीला इंग्रजी व संस्कृत आणि ६ वीला मराठी शिकवत. पुढे मॅट्रिकला इतिहास व मराठी शिकवत. शिकवताना गुरुजी खुर्चीवर बसत नसत तर टेबलाला खेटून उभे राहत. त्यांना शिकवताना पुस्तक लागत नसे. ५ वीला Tales of Shakespear ते शिकवत.



गुरुजी शाळेत वेळ अजिबात वाया घालवत नसत. तास जेव्हा नसे तेव्हा ते थेट सरळ वाचनालयात जात आणि उभ्या उभ्याच पुस्तके चाळत आणि वाचत. ते दररोज पाच पंचवीस पुस्तके आपल्या नावावर घेत असत आणि वाचून परत करीत सुटीच्या दिवशी ते अमळनेर हून रेल्वेने भुसावळ किंवा चाळीसगावपर्यन्त जायचे आणि रेल्वेत येता जाता वाचन करायचे. तेथील रेल्वेच्या वेटिंग रूम मध्ये ते वाचत बसत.

इतिहास हा विषय गुरुजी खूप छान शिकवत. अनेक वेगवेगळी माहिती ते देत असत. त्यासाठी ते खूप वाचन करीत. या वेळी मातृभूमीवरील भक्ति उचंबळून येत असे. पाठयपुस्तका व्यतिरिक्त किती तरी अवांतर माहिती ते विद्यार्थ्यांना देत असत. त्यांच्या इतिहासाच्या तासाला बसता येत नाही म्हणून इतर शिक्षक त्यांचा तास दाराच्या बाहेर लपून ऐकत असत..

शाळेतील एका शिक्षकाने पाठ घेवून दाखवायचा उपक्रम होता . इतर शिक्षक एकदा त्यांच्या पाठाला बसले होते.गुरुजींनी मराठी पद्य केकावलीतील काही श्लोक हा विषय घेतला. योग्य उदाहरणे घेवून विषय स्पष्ट करण्याची हातोटी अमोघ वक्तृत्व तळमळ इत्यादि गुणांनी त्यांनी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना भारावून टाकले. कित्येकांच्या डोळ्यांत अश्रु आले.त्यांची वाणी अंत:करणाची पकड घेणारी होती. गुरुजी जरी शिक्षणशास्त्र शिकलेले नव्हते तरी त्यांनी त्यांच्या स्वत:चेच तंत्र बनविले होते.ते आजच्या भाषेत ज्ञानरचनावादी होते. मुलांना ते खूप प्रश्न विचारून सतत विचार करायला भाग पाडत असत. विषयाविषयी किंवा शिक्षकाविषयी मुलामध्ये उगाचच ते भय निर्माण करीत नसत.पुस्तक परीक्षेच्या पलीकडे जाऊन ते शिकवत असत.

पण अधिकारी गुरुजींना समजू शकत नव्हते. एकदा मराठीचा तास असताना ते संस्कृत शिकवत होते. वास्तविक दोन्ही विषय तेच शिकवत असल्याने ते कधीही काही घेऊ शकत होते. तेव्हा भेट दिलेल्या अधिकार्याने गोखले सराकडे ही त्रुटी म्हणून दाखवली होती. एकदा इतर माहिती देत असताना इन्स्पेक्टर वर्गात आले आणि अभ्यासक्रमाविषयी शिकविण्याविषयी काहीतरी बोलले तेव्हा गुरुजी इतिहास हा फक्त राजांच्या जन्म मरणाचा आहे का ? आजूबाजूला काही घडत नाही का ? असे म्हणून पुस्तक टाकून गुरुजी निघून गेले होते.

एक दिवस एका गुलाबाला कळी लागली. त्या रात्री छात्रालयातील मुलांना घेऊन बगीच्यात बसून गुरुजींनी त्या गुलाबाच्या फुलाचा जन्मोत्सव साजरा केला. त्या रोपट्याला रंगीबेरंगी कापडाच्या तुकड्यांनी गुरुजींनी सजविले.मुलांनी गाणी म्हटली.बासरी वाजवली. यातून मुलांना निसर्गविषयी

(उर्वरित पान ३ वर)

'**परळी परिसर**' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**

✻ वर्ष ०९ ✻ अंक ३३ ✻ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५ ✻ किंमत : २ रु.

# बालकुमारांच्या कथा म्हणजे संस्कारांचा ठेवा-लक्ष्मण वाकडे






परळी वैजनाथ, (बातमीदार):- बालकुमारांच्या कथा म्हणजे संस्कारांचा ठेवा आहे, असे प्रतिपादन येथील ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक लक्ष्मण वाकडे यांनी येथे केले. परळी शहरातील शंकरपार्वती नगर भागातील संत धुराबाई आदर्श प्राथमिक विद्यालयात श्री वाकडे यांच्या 'एक होता ढम्या' या बालकुमार कथेच्या कथाकथनाचा कार्यक्रम नुकताच झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक वसंत राठोड यांच्यासह ज्येष्ठ शिक्षक मधुकर बोचरे, कवी बालाजी कांबळे, शिवकुमार तुपकर, कैलास पतंगे, किरण साळुंके आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

श्री वाकडे म्हणाले, शाळकरी मुलांवर सुसंस्कार घडविण्यासाठी बालकुमार कथा प्रभावी माध्यम आहे, बदलत्या जीवनशैलीत मुलांना कथा सांगणे, त्यांना कथा वाचून दाखवणे, मुलांकडून कथा वाचून घेणे या गोष्टी कमी होत चालल्या आहेत, मुलांवर संस्कार घडविण्यासाठी त्यांना चांगल्या दर्जेदार कथा ऐकवाव्यात, वाचायला लावाव्यात, वाचून दाखवाव्यात यासाठी शाळा, शिक्षकांनी तसेच पालकांनीही प्रयत्न करावेत असे आवाहन श्री वाकडे यांनी केले. या कार्यक्रमात 'एक होता ढम्या' या कथा मालिकेतील 'ढम्या झाला मोठ्ठा' ही कथा त्यांनी सांगितली. कथा ऐकण्यात मुले रमून गेली. दरम्यान, प्रास्ताविक शाळेतील ज्येष्ठ शिक्षक व कवी बालाजी कांबळे यांनी केले. शिवकुमार तुपकर, मुख्याध्यापक वसंत राठोड यांनीही यावेळी विचार मांडले. सुत्रसंचालन श्री कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन किरण साळुंके यांनी केले. दरम्यान, शाळेच्या वतीने श्री वाकडे यांचा मुख्याध्यापक श्री राठोड यांनी पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. या कार्यक्रमास शाळेतील शिक्षक नामदेव शिंदे, सारंग टेकाळे, निवृत्ती येवले, निखील सावजी, श्री कुरवडे, विठ्ठल राठोड, पवनराज राठोड, जगन्नाथ वेदपाठक आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. ***

## प्रा.व्ही.टी.गित्ते यांना पीएच.डी.प्रदान



परळी वैजनाथ (बातमीदार):- येथील नागनाथआप्पा हालगे अभियांत्रिकी महाविद्यालय परळी वैजनाथ येथील प्रा.व्यंकट तातेराव गित्ते यांना नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ. संभाजीनगर यांच्याकडून १२ डिसेंबर २०२५ रोजी गणित या विषयात पीएच.डी. प्रदान करण्यात आली आहे.

श्री. गित्ते यांनी 'CONVECTION AND MASS TRANSFER EFFECTS ON ROTATING FLOW AND GRAVITY MODULATION' या विषयावर शोध प्रबंध सादर केला होता. त्यासाठी मुख्य मार्गदर्शक म्हणून उत्तमचंद बगडिया महाविद्यालय, रिसोड येथील प्राचार्य डॉ.विनोद कुलकर्णी सर होते. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील गणित विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.दीपक पाचपट्टे सर, प्रा.डॉ.रवींद्र लहरीकर सर व गणित अभ्यास मंडळाचे चेअरमन प्रा.डॉ.जगदीश ननवरे सर यांचे मार्गदर्शन लाभले. बाह्य परीक्षक म्हणून पुणे येथील विश्वकर्मा विद्यापीठाचे गणित विभाग प्रमुख प्रा.डॉ. जगदीश तावडे उपस्थित होते.

या यशाबद्दल परळी वैजनाथ येथे त्यांच्या शिक्षक व प्राध्यापक मित्र मंडळाकडून त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. सत्कार समारंभास सुरेशनाना फड, प्रदीप खाडे सर, आदर्श शिक्षक अंकुश फड गुरुजी, बुरांडे सर, दराडे साहेब, संतोष सांगळे सर, मु.अ.तारे सर, प्रा.दराडे सर, प्रा.डॉ.सूर्यकांत गित्ते सर, प्रा.डॉ.एल.आर.मुंडे सर, मंजुळदास भिसे सर, गोविंद साठे सर, रामेश्वर राठोड सर, आदर्श शिक्षक कांदे गुरुजी, भास्कर आंधळे सर, मधुकर जोगदंड सर, गोविंदराव ढाकणे, घुले सर, सायस मुंडे सर, रघुनाथ मुंडे सर, गवते पाटील, जगन्नाथ वणवे, रंगनाथ काटके, अरुण गित्ते, गोविंद तातेराव गित्ते, एकनाथ तगरे, विजय चंडोल इ.उपस्थित होते. ***

## कवी दिवाकर जोशी यांचे काव्यसादरीकरण स्पर्धेत यश



परळी वैजनाथ, (बातमीदार):- महाराष्ट्र शासनाच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित शिक्षक अधिकारी व कर्मचारी विभागीय स्पर्धा २०२५ मधील स्वरचीत काव्य सादरीकरण स्पर्धेत परळी तालुक्यातील कासारवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक व ज्येष्ठ कवी दिवाकर जोशी यांनी द्वितीय क्रमांक मिळवला आहे.

त्यांच्या या यशाबद्दल मराठवाडा साहित्य परिषदेच्या परळी शाखेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. तसेच शाळेतील शिक्षक व मित्र परिवारानेही श्री जोशी यांचे या यशाबद्दल अभिनंदन केले आहे. **

## सण उत्सवानिमित्त वाद्य वाजविण्याचे दिवस जाहिर

बीड, (जिमाका) उत्सव कालावधीत पंधरा (१५) दिवस सकाळी ०६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत वाद्य वाजविण्यास परवानगी देण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी ध्वनी प्राधिकरण तथा जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेशी सल्लामसलत करुन दिवस निश्चित करुन त्याची आगाऊ यादी ०१ जानेवारी किंवा तत्पूर्वी जाहीर करणेबाबत नमूद केले आहे.

जिल्हयात ध्वनी प्रदुषण नियंत्रण प्राधिकरण यांचे कार्यालय नसल्याने पोलीस अधिक्षक, बीड यांनी बीड जिल्हयात ०१ जानेवारी २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत सकाळी ६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत वाद्य वाजविण्याची परवानगी देण्यासाठी १५ दिवस प्रस्तावित केले आहेत.

बीड जिल्हयात ध्वनी प्रदुषण नियम २००० मधिल नियम ३ व ४ तसेच ध्वनि प्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम २००० मधिल अटी व शर्तीस अधिन राहून खालील प्रमाणे नमुद दिवशी ०१ जानेवारी २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधी दरम्यान सकाळी ०६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत ध्वनीची मर्यादा राखून वाद्य वाजविण्यास परवानगी देण्यात येत आहे. शिवजयंती १ दिवस, ईद ए मिलाद १ दिवस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती १ दिवस, १ मे महाराष्ट्र दिन १ दिवस, गणपती उत्सव चार दिवस अनंत चतुर्दशीसह शेवटचे तीन दिवस, नवरात्री उत्सव २ दिवस अष्टमी आणि नवमी, दिपावली एक दिवस, लक्ष्मीपुजन, ख्रिसमस एक दिवस, ३१ डिसेंबर १ दिवस, उर्वरित दोन दिवस महत्वाच्या कार्यक्रमासाठी राखीव असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

(उर्वरित पान ३ वर)

## साने गुरुजी शिक्षक म्हणून कसे होते.?

वेगळेच प्रेम निर्माण झाले. गुरुजी एकदा शिकवत होते. तेवढ्यात पाऊस सुरू झाला. गुरुजींनी शिकविणे थांबविले आणि म्हणाले बाहेर पाऊस पडताना मी का शिकवत बसू ? आणि वर्ग सोडून दिला.

साने गुरुजी प्रेमळ म्हणून प्रसिद्ध असले तरी पदाचा रुबाब कुणी केला की ते तो अन्याय किंवा चुका सहन करीत नसत.पालक आणि शिक्षक नात्याविषयी त्यांची भूमिका स्पष्ट होती. अमळनेर च्या शाळेत मामलेदारांचा मुलगा शिकायला होता.तो अभ्यास करीत नसे. गुरुजींनी त्याच्या वहीवर weak in studies असा शेरा मारला.मामलेदारांना ते फारच झोंबले.त्यांनी मुलगा शाळेत येतो तर, शिक्षक काय करतात ? असा प्रश्न विचारला. तेव्हा गुरुजींनी उलटे उत्तर दिले मुलगा फक्त सहा तास शाळेत असतो, बाकी १८ तास घरीच असतो. तेव्हा पालक काय करतात ? या शाळेचे मुख्याध्यापक गोखले गुरुजींना साने गुरुजींचा स्वभाव आणि जीवनप्रेरणा खूप चांगल्या रितीने समजल्या होत्या. शाळेने १९१८ सालापासून मुलांसाठी छात्रालय वसतिगृह सुरू केले होते. हे छात्रालयाचे काम साने गुरुजींनी बघावे असे गोखले गुरुजींनी सुचविले. त्याप्रमाणे गुरुजी ते काम बघू लागले. फक्त हिशोबाचे काम तुम्ही माझ्याकडे देवू नका असे गुरुजी म्हणाले.

वात्सल्याशिवाय आणि प्रेमाशिवाय सद्गुणसंवर्धन करणे केवळ अशक्य असते यावर दोघांचेही एकमत होते. त्यांच्या येण्याने छात्रालयाचे अनाथपण गेले. मुलांचे उदास चेहरे फुलून गेले. मुले सतत त्यांच्या आजूबाजूला असत. शिस्तीतून मुलांना ते बदलावण्यापेक्षा ते प्रेमाने मुलांना बदलावण्याचा प्रयत्न करीत. इथून मागचे अधिक्षक हे मुलांना आरडाओरडा करुन, मारून उठवत..पण गुरुजी आल्यावर ते गोड प्रार्थना म्हणून गीते म्हणून मुलांना उठवत. 'जागिये रघुनाथ कुवर, पंछी बन बोले' अशी गाणी म्हणत गुरुजी मुलांना उठवत. मुले म्हणत की साने सर उठवायला आले की झोप कशी पटकन पळून जाते. प्रार्थना मंदिरात प्रार्थना होई. मुले तिथे फुले आणून ठेवीत.उदबत्त्या लावत. सुरेल आवाजात गीत व भजने म्हटली जात. कधी गंमत तर कधी विनोद यातून सवयी शिस्त लावली जाई. गुरुजींनी कोरडेच रुक्ष उपदेशाचे घुटके उठता बसता त्या बाल जीवांना पाजण्याऐवजी वात्सल्यपूर्ण कृतीचा आश्रय केला. छात्रालयात मुले कपडे धूत नसत. खोल्या स्वच्छ ठेवत नसत. पुस्तके,सामान इकडे तिकडे पडलेले असे. कंदिलाच्या काचा स्वच्छ केलेल्या नसत. कंदिलाच्या वाती कातरलेल्या नसत पण गुरुजी त्यावरून मुलांवर चिडण्यापेक्षा ती कामे गुरुजी स्वत:च करीत. मुले शाळेत गेली की साने गुरुजी गुपचुप मुलांच्या कपड्याच्या घड्या घालत, कंदिलाच्या काचा पुसून ठेवत.मुलांचे कपडे धुवून ठेवत. मुलांना हे समजत नव्हते. एक दिवस एक मुलगा आजारी होता म्हणून तो छात्रालयातच झोपलेला होता. गुरुजी खोलीत येताच त्याने झोपण्याचे नाटक केले. गुरुजी काय काय कामे करतात हे त्याने बघितले. गुरुजींनी सर्व कपड्यांच्या घड्या केल्या. खराब कपडे धुवायला घेतले. त्या मुलाने संध्याकाळी सर्व मुले शाळेतून आल्यावर इतर मुलांना सांगितले. मुलांनी ते ऐकल्यावर मुले लज्जित झाली. मुले म्हणायची आम्हाला लाजविण्यासाठी करता की काय ?

तेव्हा ते म्हणायचे अरे आई का मुलाला लाजविण्यासाठी का हे सारे करत असते? मुलांना उपरती झाली. मुले अंतर्मुख झाली.

मुले कपडे धुवू झाली. कपड्यांच्या घड्या घातल्या. कंदिलाच्या काचा पुसून ठेवू लागले. मुलांना कोणताही उपदेश न करता किंवा मुलांना न रागावता हे गुरुजींनी घडवून दाखविले. कुणाला लागले खुपले ताप आला तर गुरुजी आई होऊन सेवा सुश्रुषा करायचे. शाळेव्यतिरिक्त मुले त्यांच्या पाठीमागेच फिरायची. काही मुले शौचालय दूर होते म्हणून रात्रीच्या वेळी व्हरांड्यातच संडास करीत .मुलांनी घाण केली की गुरुजी लगेच ती स्वस्छ करीत. ते म्हणत माझ्या हातांना सेवेची भूक आहे. घाण दूर करावी, अश्रु पुसावे ह्याची या माझ्या हातांना असोशी आहे. मी घाण शोधीत जातो.

मुलांची गुरुजींना टोकाची काळजी असे. कृष्णा परळीकर हा विद्यार्थी आजारी पडला आणि गावाकडे गेला. गावाकडून तो पत्र पाठवायचा. पुढे पत्र येणे बंद झाले. तेव्हा गुरुजी त्याच्या गावाला गेले. त्याला विषमज्वर झालेला होता. गुरुजी तिथेच राहिले आणि त्याची सेवासुश्रुषा केली. यशवंत पवार हा विद्यार्थी श्रीमंत कुटुंबातील मुलगा खोली झाडत नसे.गुरुजी त्याची खोली झाडू लागले ,तो ही खोली झाडू लागला. आपले पदार्थ इतरांना द्यावे हा उपदेश गुरुजी स्वत: ही पाळत असत. सकाळ संध्याकाळच्या प्रार्थनेच्या वेळी गुरुजी खूप काही मुलांशी बोलत. जगातल्या विविध महापुरुषांची माहिती सांगत. गुरुजी येणाऱ्या वर्तमानपत्रातील मुलांनी नेमके काय वाचावे यावर खुणा करुण ठेवीत. मुलांमध्ये गुरुजी विटी दांडू खेळत असत. गरीब मुलांची फी भरत. असे साने गुरुजी आपले सर्वांचे शिक्षक म्हणून मूळ पुरुष आहेत. त्यांच्या प्रेरणेने आपले शिक्षक होणे अधिक अर्थपूर्ण करू या..!

**– हेरंब कुलकर्णी**
ज्येष्ठ पत्रकार